प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०८.०३.२०१९**

# सिडकोमध्ये जागतिक महिला दिन साजरा
## अनघा मोडक यांच्या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन

"स्त्रियांनी नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आयुष्य समरसून जगण्याची क्षमता प्राप्त केली तर जीवनात केवळ आनंद आणि आनंदच असेल", असे उद्गार सुप्रसिद्ध निवेदिका व रेडीओ जॉकी **श्रीमती. अनघा मोडक** यांनी काढले. सिडको भवन येथे सिडको एम्प्लॉईज युनियनतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त अनघा मोडक यांचा **"जीना इसीका नाम है (विविध क्षेत्रांतील ध्यासांचा उलगडा)"** हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास **श्री. अशोक शिनगारे**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्रीमती विद्या तांबवे**, व्यवस्थापक (कार्मिक), सिडको, **श्रीमती मार्गजा किल्लेकर**, व्यवस्थापक (पुनर्वसन), सिडको, **श्रीमती रेखा धर**, अतिरिक्त मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सिडको, **श्री. निलेश तांडेल**, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन, **श्री. जे. टी. पाटील**, सरचिटणीस, सिडको एम्प्लॉईज युनियन, **श्री. मिलिंद बागुल**, अध्यक्ष, सिडको बी.सी.एम्प्लॉईज असोसिएशन हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रिमाई फुलेंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन त्यांच्या स्मृतीस वंदन करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी बोलताना श्रीमती. अनघा मोडक यांनी स्त्री-पुरुष अशी तुलना करण्यापेक्षा एक सुसंस्कृत माणूस होऊन जगणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत स्त्रियांनी स्वत:साठीही जगावे, असे मत व्यक्त केले. "आपल्याला काय मिळाले नाही, त्यापेक्षा काय लाभले आहे त्याचा विचार करा", असे सांगत संकटांचे स्वागत करून संकटांचे रूपांतर संधींमध्ये करण्याचे त्यांनी आवाहन केले. आजारपणात दृष्टी गमावल्यानंतर ही स्वत:च्या अंतरंगात डोकावून बघण्याची संधी असल्याचे मानून आपण प्रत्येक क्षण आनंदाने जगलो, असे आपल्या संघर्षाबद्दल बोलताना त्या सांगत होत्या. दूरचित्रवाणीसारख्या दृक्-श्राव्य माध्यमात निवेदिका म्हणून काम करताना हा सकारात्मक दृष्टिकोनच आपल्या कामी आल्याचे त्यांनी सांगितले. आपल्यातील शारीरिक उणिवांवर मात करत यश प्राप्त केलेल्या व समाजासाठी काम करणाऱ्या काही व्यक्तिंबद्दलचे प्रेरणादायी किस्सेही श्रीमती. अनघा मोडक यांनी यावेळी सांगितले.

श्री. अशोक शिनगारे यांनी आई, बहिण, पत्नी आणि मुलगी हे कुटुंबाचे व पर्यायाने समाजाचे स्तंभ असल्याचे उद्गार काढत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कामगिरीची मोहोर उमटवलेली असली तरी स्त्री सक्षमीकरण व स्त्री सुरक्षा या मुद्द्यांना प्राधान्य द्यावे लागणार असल्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती विद्या तांबवे यांनी या प्रसंगी बोलताना "स्त्रियांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून आव्हानांना सामोरे गेल्यास संकटे दूर होण्याबरोबरच त्यांचा आत्मविश्वासही वृद्धिंगत होईल", असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी मार्च २०१९ मध्ये निवृत्त होणाऱ्या **श्रीमती शैलजा नाईक, श्रीमती उषा भोईटे, श्रीमती भारती कंटे, श्रीमती आरती कोटेकर, श्रीमती रचना सोनावणे आणि श्रीमती विमल म्हात्रे** या महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचा समारोप श्रीमती. अनघा मोडक यांच्या सहकारी श्रीमती. साधना यांनी गायलेल्या 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' या बोधपर गिताने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्रीमती अनिता उरणकर** तर आभारप्रदर्शन **श्रीमती सुलोचना कडू** यांनी केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**